**नियमित दिवाणी दावा क्र. १८/२०१५ मधील निशाणी क्र.४१ वरील आदेश**

(बबाबाई यादव वि. शशिकांत रायकर व इतर)

सदरचा अर्ज प्रतिवादी क्रमांक ५ अ यांनी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. अर्ज व वादीचे म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादींच्या विद्वान विधिज्ञाचा युक्तिवाद ऐकला.

०३. प्रकरणाचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तुत दावा वाटपासाठी, जाहीर ठराव, निरंतर मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्रमांक ५ अ यांच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रदद करण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्रांक ५ अ ला दिनांक १२.१०.२०२१ रोजी समन्सची बजावणी झालेली आहे. प्रतिवादी क्रमांक ५ अ ने दिनांक १२.०१. २०२२ रोजी किंवा त्यापुर्वी दाव्याला कैफियत दाखल करणे आवश्यक होते. परंतु प्रतिवादी क्रमांक ५ अ यांनी मुदतीत कैफियत दाखल न केल्यामुळे त्याच्या विरुध्द विनाकैफियत आदेश झाला असे मानण्यात येते.

०४. प्रतिवादी क्रमांक ५ अ यांनी कैफियत दाखल करण्यास एक वर्षे एक महिन्याचा विलंब झालेला आहे. साक्षीसमन्स बजावले त्या कालावधीत कोरोना १९ या आजाराची साथ आल्यामुळे प्रवितादी क्रमांक ५ अ हे न्यायालयता उपस्थित राहु शकले नाही. सदर कारण संयुक्तिक आहे. तसेच वादी व प्रतिवादीं यांच्या मधील वादाचे निराकारण गुणावगुणांवर होण्याकरिता प्रतिवादी क्रमांक ५ अ यांना कैफियत दाखल करण्याची संधी देणे नैसर्गिक न्याय तत्वास अनुसरुन आहे. परंतु, सदर विलंबासाठी प्रतिवादी क्रमांक ५ अ यांनी वादीला खर्च देणे न्यायोचित राहील. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

## आदेश

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्रमांक ५ अ याना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब वादीस रक्कम रुपये ५००/— खर्च दिल्यानंतर माफ करण्यात येतो.

NANAWARE MOHINI DATTATRAY

Digitally signed by NANAWARE MOHINI DATTATRAY
Date: 2025.09.25 17:05:11 +0530

स्थळः— इगतपुरी ( मो. द. ननवरे )

दिनांकः— २५/०९/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, इगतपुरी.